## कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

टोल फ्री क्रमांक - 1064

कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

**:: प्रेस नोट ::** दिनांक :- 11.05.2020.

**नगर परीषद भोकरदन येथील मुख्याधिकारी यांचेकडुन काम करुन देतो, असे म्हणुन त्यांचे नावाखाली यापुर्वी 32,000/- रुपये घेवुन पुन्हा 38,000/- रुपयांची लाच घेतांना खाजगी इसम श्री. हमद अमर अमौदी चाऊस उर्फ साई यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | श्री. हमद पिता अमर अमौदी चाऊस उर्फ साई वय 55 वर्ष व्यवसाय मजुरी, देशमुख गल्ली भोकरदन ता भोकरदन जि जालना ( खाजगी इसम) |
| 2 | गुन्हा घ तारीख व ठिकाण | :- | दि- 11.05.2020 रोजी नगर परीषद कार्यालय समोर रोडवर, भोकरदन ता. भोकरदन जि. जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 38,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांची सप्टेंबर 2018 ते मार्च 2020 पावेतोची प्रोव्हीजन पेन्शन मुख्याधिकारी नगर परीषद भोकरदन यांचेकडुन मंजुर करुन देतो, असे सांगुन त्यांचे नावाखाली खाजगी इसम नामे श्री. हमद पिता अमर अमौदी चाऊस उर्फ साई याने त्यांचेकडुन यापुर्वी 32,000/- रुपये घेतले असुन तो पुन्हा 38,000/- रुपयांची मागणी करीत आहे. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन आज दिनांक 11.05.2020 रोजी पडताळणी करुन सापळा लावला असता खाजगी इसम नामे श्री. हमद पिता अमर अमौदी चाऊस उर्फ साई याने मुख्याधिकारी यांचेकडुन तुमचे प्रोव्हीजन पेन्शन मंजुर करुन देतो, असे सांगुन मुख्याधिकारी न प भोकरदन यांचे नावाखाली 38,000/- रुपयांची लाचेची मागणी करुन 38,000/- रुपये रक्कम स्विकारली असतांना नमुद खासगी इसमास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने पंचासमक्ष नगर परीषद भोकरदन कार्यालयासमोर, भोकरदन ता भोकरदन जि जालना येथे रंगेहाथ पकडले आहे.

खासगी इसम नामे श्री. हमद पिता अमर अमौदी चाऊस उर्फ साई रा. देशमुख गल्ली भोकरदन ता भोकरदन जि जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री.अरविंद चावरीया, अपर पोलीस अधिक्षक डॉ. अनिता जमादार, ला.प्र.विभाग औरंगाबाद, पोलीस उप अधिक्षक श्री.रविंद्र डी.निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक श्री. एस.एस.शेख, तसेच कर्मचारी श्री.गणेश चेके, श्री.सचिन राऊत, श्री. शिवाजी जमधडे व चालक श्री. प्रविण खंदारे यांनी पार पाडली.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाप्रवि,जालना.